# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक १३/०६/२०१७**

**दु ११.३० वा.**

| अनु. क्र. | विषयाचे नाव | मा.स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | **मागील मा. स्थायी समिती सभा दि. २९/०५/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.** | **ठराव** :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. २९/०५/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुनील आचोळकर सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २ | **वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सॅटेलाईट सिटी योजने अंतर्गत मलनि:स्सारण प्रकल्पांतील Zone-२ च्या कामासाठी मे.घारपुरे इंजिनिअरींग ॲण्ड कंन्स्ट्रक्शन प्रा.लि.यांना कामासाठी मुदतवाढ देणेबाबत.** | **ठराव** :- वरील प्रस्तावानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सॅटेलाईट सिटी योजने अंतर्गत मलनि:स्सारण प्रकल्पांतील STP Zone- २ च्या कामासाठी नेमलेले ठेकेदार मे. घारपुरे इंजिनिअरींग वसई-विरार एस टी पी प्रा.लि. यांचे विनंतीनुसार व सल्लागार मे.टंडन अर्बन सोल्यूशन प्रा.लि. यांनी केलेल्या शिफारशीनुसार मलनि:स्सारण प्रकल्पांतील Zone-२ च्या कामासाठी दि. ३१/१२/२०२७ पर्यंत मुदतवाढ मंजूर करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३ | **अग्निशमन विभागाचे टर्न टेबल लॅडर ४० मिटर उंच शिडीचे वाहनासाठी लागणारे सुटे भागाची खरेदी करणे बाबत.** | **ठराव** :- महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडील ४० मीटर उंचीचे टर्न टेबल लॅडर वाहन विदेशामधुन आयात केले असल्याने वाहनासाठी लागणारे स्पेअरपार्ट कंपनीकडून अथवा त्यांचे भारतामधील एकमेव असलेले अधिकृत विक्रेते ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. बेंगलोर यांचेकडून उपलब्ध होतात. ते साहित्य अन्यत्र उपलब्ध होत नाही. विदेशातील मुळ कंपनीकडून सदर स्पेअरपार्ट खरेदी करणेंस बराच कालावधी लागणार असल्याने व वाहन बंद राहू नये याकरीता रोझनबार इंटरनॅशनल ए जी कंपनीचे भारतामधील एकमेव असलेले अधिकृत विक्रेते मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचेकडून अहवालात नमुद केलेले स्पेअरपार्ट विना निविदा थेट खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. ३०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. तीस लक्ष) पर्यंतचे खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ४ | **<u>वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवर महानगरपालिकेच्या विश्रांतिगृहासाठी काळजीवाहक - नि - खानसामा (Caretaker-cum-Khamsama) हे पद निर्माण करणेबाबत तसेच कलम ५३(३) अन्वये या पदावर सहा महिन्यांचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात भरणेबाबत.</u>** | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नवघर-माणिकपूर येथील विश्रांतीगृहाची देखभाल ठेवणे, दैनंदिन स्वच्छता ठेवणे, विश्रांतीगृहात लाईट, फॅन, ए.सी., पाणी, इत्यादींची व्यवस्था पहाणे तसेच याबाबत काही तक्रारी असल्यास त्याची संबंधित विभागाकडून दुरुस्ती करून घेणे तसेच विश्रांतीगृहात आलेल्या अधिकाऱ्यांसाठी चहापाणी, नाश्ता, जेवण इत्यादीची सोय करणे याकामी सदर विश्रांतीगृहासाठी काळजीवाहक-नि- खानसामा (Caretaker-cum-Khamsama) आवश्यकता आहे. यासाठी वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवर महानगरपालिकेच्या मालकीच्या नवघर-माणिकपूर येथील विश्रांतीगृहासाठी काळजीवाहक-नि- खानसामा (Caretaker-cum-Khamsama) हे पद निर्माण करणे तसेच कलम ५३ (३) अन्वये या पदावर सहा महिन्याचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात भरणेबाबतचा प्रशासनाकडून आलेला प्रस्ताव पाहणेत आला. सदर प्रस्तावार विचार विनिमय करुन खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत आला.<br><br>वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवर काळजीवाहक-नि-खानसामा (Caretaker-cum-Khamsama) हे पद निर्माण करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधियमाचे कलम ५१ (३) अन्वये ही सभा मान्यता देत आहे.<br><br>अ. क्र. \| पदाचे नांव \| वेतनश्रेणी<br>१. \| काळजीवाहक-नि- खानसामा (Caretaker-cum-Khamsama) \| रु. ५२००-२०२०० ग्रेड पे १८००<br><br>उक्त अधिनियमाचे कलम ५१ (४) अन्वये सदरचा पद मंजूरीसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत यावा. सदर पद शासनाकडून मंजूर होईपर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनयमाचे कलम ५३ (३) अन्वये सहा महिन्याचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात भरणेंस तसेच त्यासाठी होणाऱ्या खर्चास आजची सभा प्रशासकीय व आर्थिक ंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५ | **<u>घनकचरा व्यवस्थापन योजने अंतर्गत १२ क्युबीक मिटर क्षमतेचे रिफ्युज कॉम्पॅक्टर (Refuse</u>** | **ठराव** :- वरील प्रस्तावानुसार मा.सर्वोच्च न्यायलयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने कंत्राटदार मे. ए.जी. एनविरो इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांनी केलेल्या विनंती नुसार व त्या अनुषंगाने सल्लागार मे.टंडन अर्बन सोल्यूशन प्रा.लि. यांनी दिलेल्या अहवाल/अभिप्राय नुसार व निविदा पुर्व बैठकीत ठरलेनुसार १२ क्यूबीक मीटर क्षमतेचे २० नग रिफ्युज कॉम्पॅक्टर |

| | | |
|---|---|---|
| | Compactor) व मृत जनावरे उचलणे व वाहून नेणारे वाहन (Dead animal lifting & Transportation Van) पुरवठा व वितरण (Supply & Dellivery) पुरविणे कामी मंजूर निविदाधारक मे.ए.जी. एनविरो इन्फाप्रोजेक्टरस प्रा.लि यांना देण्यांत आलेल्या कार्यादेशात दिलेली मुदत वाढवून देणे बाबत. | (Refuse Compactor) व १ नग मृत जनावरे उचलणे व वाहून नेणारे वाहन (Dead animal lifiting & Transporation Van) पुरवठा व वितरण (Supply & Delivery) करणेकामी मे.ए.जी. एनविरो इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. यांना दि. ०४/०८/२०१७ पर्यंत मुदवाढ मंजूर करणेंत येत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६ | सन२०१७-१८, सन२०१८-१९ व सन२०१९-२० द्यवित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील विविध विकास कामे करण्यासाठी तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करणे, (ह्यामध्ये तलाव,बगीचे सूशोभिकरण,ब्रिज,इमारत वैगेरे) कामी व सहभाग घेतलेल्या निविदेमधील इच्छुक तांत्रिक सल्लागाराची पॅनलवर नियुक्ती करणे. | **ठराव** :- सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० द्यवित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील विविध विकास कामे करण्यासाठी तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करणे, (ह्यामध्ये तलाव,बगीचे सूशोभिकरण,ब्रिज,इमारत वैगेरे) कामी प्राप्त निविदा रद्द करून ई-कार्यप्रणालीद्वारे बी-२ द्वितीय फेर निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री.किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७ | प्रभाग समिती (ई) नालासोपारा अंतर्गत मौजे गास विभागातील गास | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील मौजे गास विभागातील गास मोठा तलाव मत्स्यसंवर्धनासाठी सन २०१७ ते २०२० (तीन वर्षासाठी) करीता प्राप्त झालेल्या निविदा धारकांपेक्षा श्री. |

| | | |
|---|---|---|
| | **मोठा तलाव मत्स्यसंवर्धनासाठी सन २०१७ ते २०२० (तीन वर्षासाठी) करिता प्राप्त झालेला ज्यादा देकाराच्या निविदा स्विकृत करणेबाबत.** | सरोश शफिक डबरे यांची किमान देकारापेक्षा रक्कम रू. १८,११,५५०/- ची सर्वात जास्त देकाराची निविदा प्राप्त झाली असून सदर जादा देकाराच्या रक्कमेत प्रति वर्षी १०% वाढ करून निविदा स्विकृत करणेंस व त्यानुसार मंजूर निविदाधारकांबरोबर संविदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. समीर डबरे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८ | **प्रभाग समिती (ई) नालासोपारा अंतर्गत मौजे निर्मळ विभागातील मालई तलाव मत्स्यसंवर्धनासाठी सन २०१७ ते २०२० (तीन वर्षासाठी) करिता प्राप्त झालेल्या ज्यादा देकाराच्या निविदा स्विकृत करणेबाबत.** | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील मौजे निर्मळ विभागातील गास मालई तलाव मत्स्यसंवर्धनासाठी सन २०१७ ते २०२० (तीन वर्षासाठी) करीता प्राप्त झालेल्या निविदा धारकांपेक्षा श्री. अतिक युसूफ डबरे यांची किमान देकारापेक्षा रक्कम रू. १०,१५,७८६/- ची सर्वात जास्त देकाराची निविदा प्राप्त झाली असून सदर जादा देकाराच्या रक्कमेत प्रति वर्षी १०% वाढ करून निविदा स्विकृत करणेंस व त्यानुसार मंजूर निविदाधारकांबरोबर संविदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. समीर डबरे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९ | **अंगणवाडी/ बालवाडीतील मुलांना शैक्षणिक साहित्य पुरवठा करणे बाबत.** | **ठराव** :- महिला बालकल्याण समितीने शिफारस केल्यानुसार सन २०१७-१८ च्या प्राप्त होणाऱ्या यादी नुसार अंगणवाडी/बालवाडी विद्यार्थ्यांना मुलांना सॅग, टिफीन बॉक्स, वॉटर बॉटल, इ. साहित्य वाटप करण्यांत यावे. याकामी ई-निविदा प्रक्रिया करून साहित्य खरेदी करण्यांत यावे. महानगरपालिकेकडून साहित्य वाटपाकरीता मंजूर कर्मचारी व वाहने उपलब्ध करून देण्यांत यावी. याकामी ई-निविदा प्रक्रिया करून साहित्य खरेदी करणेकामी अंदाजे येणाऱ्या २६,२५,०००/- रू. खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील सूचक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १० | **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात डिजीटल वॉल पेन्टींग (LEBC) द्वारे जनजागृती करणे कामीच्या होणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.** | **ठराव** :- 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत येणाऱ्या योजना व नॅशनल हेल्थ मिशन कडून येणाऱ्या विविध योजना व महापालिका क्षेत्रातील सार्व. आरोग्य संबंधित सुचना व उपाययोजना करणे करीता उदा. स्वच्छ भारत पाऊल पुढे नियंत्रण कार्यक्रम ई, स्लोगन डिजीटल वॉल पेन्टींगद्धारे महापालिका क्षेत्रात जनजागृती करणे, माहिती देणे आवश्यक आहे. तरी सदरच्या डिजीटल वॉल पेन्टींग (भिंती चित्र) तयार करून घेणेकामी होणाऱ्या रू. ५० लाख अपेक्षित खर्चास ही सभा मान्यता देत असून इच्छुक ठेकेदारांकडून निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ११ | **वसई-विरार शहर महानगरपालिका, धानिव/पेल्हार कार्यक्षेत्रातील बिलालपाडा, धानिव, पेल्हार, गावराईपाडा व शिरसाड दैनंदिन बाजार फी वसुल करणेकामी सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरिता वार्षिक ठेका पध्दतीने देणेबाबत.** | **ठराव** :- सदर विषयाबाबत साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. बिलालपाडा, धानिव, पेल्हार, गावाराईपाडा व शिरसाड दैनंदिन बाजार फी वसुलीकामी प्राप्त झालेल्या निविदांपैकी झेड प्रोटेक्शन प्रा.लि. यांची रक्कम रु. ४१,२५,०००/- (अक्षरी एकेचाळीस लाख पंचवीस हजार रु.मात्र) ही सर्वात जास्त दराची निविदा व सदर निविदेच्या रक्कमेवर नियमावलीनुसार लागू होणारा सेवाकर वसुल करणेंस ही सभा मान्यता देत असून सदर जास्त निविदा धारकांसोबत संविधा करणेंस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |